

# HUMAN RIGHTS

**BCUD- Savitribhai Phule Pune University, Pune**

Sangvi, Pune 27

**9th & 10th Jan 2015**



Editor-in-Chief
Dr. Pravin Sasane

Principal
Dr. M. G. Chaskar

ब) मानवी हक्क : महिला सबलीकरण


| | | | |
|---|---|---|---|
| १) | Women Representative in early Buddhist Inscription | Dr. Amol Vidyasagar | ६० ते ७२ |
| २) | Human Rights and Women Empowerment | Dr. Swati Rajan | ७३ ते ८२ |
| ३) | Human Rights and Domestic Uiolence in India | Prof. Nanda Rashinkar | ८३ ते ८७ |
| ४) | Indian Democracy and Uiolence Women's : Human Rights | Dr. Neeta Bokil | ८८ ते ९३ |
| ५) | Government Measures to strengthen Self - Help Group to Empower Women in India | Prof. Vidula Vyawahare | ९४ ते १०० |
| ६) | Human Rights and ISLAM with SPL Ref. HO Rights of Women in Muslim Communities. | Prof. Shaukat Khan | १०१ ते १०६ |
| ७) | महिलांच्या मानवी अधिकारांची वस्तुस्थिती आणि संवर्धन | डॉ. माणिक सोनवणे | १०७ ते १११ |
| ८) | मानवी हक्क : महिला सबलीकरण | डॉ. नाथा रामभाऊ मोकाटे | ११२ ते ११४ |
| ९) | मानवी हक्क आणि स्त्रिया | डॉ. माधुरी मांडलिक | ११५ ते ११८ |
| १०) | मानवी हक्क आणि महिला | डॉ. वैशाली पवार | ११९ ते १२२ |
| ११) | मानवी हक्क : महिला सबलीकरण | प्रा. सावित्री जाधव | १२३ ते १२६ |
| १२) | मानवी हक्क आणि स्त्री जीवन | प्रा. गणेश पंढरीनाथ भामे | १२७ ते १३१ |
| १३) | मानवी हक्क आणि महिला | प्रा. भारत राठोड | १३२ ते १३७ |
| १४) | मानवी हक्क आणि महिला सबलीकरण | प्रा. ओवाळे दत्तात्रय जयसिंग | १३८ ते १४० |
| १५) | मानवी हक्क आणि स्त्री | प्रा. रोडे महादेव गंगाराम | १४१ ते १४४ |
| १६) | मानवी हक्क आणि महिला सबलीकरण | राहूल पठारे | १४५ ते १४७ |
| १७) | मानवी हक्क आणि स्त्रीवाद | मयूरी अमणगी | १४८ ते १४९ |
| १८) | मानवी हक्क आणि महिला | स्वप्ना पातोंड | १५० ते १५२ |

 ISBN No. : 978-93-84283-67-4

# मानवी हक्क आणि महिला

सहा. प्रा. भरत राठोड (राज्यशास्त्र विभाग प्रमुख)
प्रा. रामकृष्ण मोरे कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय,
आकुर्डी, पुणे
Email - 82rathod@gmail.com

**प्रस्तावना :**

समकालीन सामाजिक शास्त्रात मानवी हक्क ही संकल्पना महत्त्वपूर्ण मानली जाते. दुसऱ्या जागतिक महायुद्धानंतर ब्रिटिशांच्या वसाहतवादी राजवटीतून स्वतंत्र झालेल्या बहुतांश राष्ट्रांनी लोकशाही शासन प्रणालीचा स्वीकार केला. राज्यघटनांच्या माध्यमातून जनतेला राजकीय, सामाजिक, आर्थिक, राजकीय, आर्थिक दहशतवाद, नक्षलवाद अशा अनेक समस्या निर्माण झाल्या. या समस्येच्या आधारावरच मानवी हक्क ही संकल्पना अभ्यासली जात आहे.

**मानवी हक्क आणि महिला :**

मानवी अधिकारात महिलांचा अभ्यास केवळ भारतापुरताच केला जातो असे नाही. हा जागतिक पातळीवरचा विषय आहे. जगातील सर्वच राष्ट्रांची समाज रचना ही पुरुष प्रधान समाज रचना म्हणून ओळखली जाते. त्यामुळे पाश्चिमात्य युरोपीय राष्ट्रांतही महिलांना सामाजिक, आर्थिक, राजकीय, सार्वजनिक क्षेत्रापासून दीर्घकाळ वंचित राहावे लागले आहे. म्हणून आंतरराष्ट्रीय स्तरावर महिलांच्या हक्कासाठी लढणाऱ्या संघटना व साहित्यांची निर्मिती झाली आहे. मेरी वुल स्टोन क्राफ्ट यांनी लिहिलेले 'द विंडीकेशन ऑफ राइट ऑफ वुमेन' हे पुस्तक आंतरराष्ट्रीय स्तरावर स्त्री मुक्तीसाठी अत्यंत महत्वाचे ठरले. फ्रेंच लेखिका सिमंत बुआ यांनी 'द सेकंड सेक्स' हे पुस्तक १९४८ साली लिहिले. १८ मार्च १९७० ला अमेरिकन स्त्रियांनी विमेन्स स्टाइक फॉर पीस चे आयोजन केले. भारतातील स्त्रियांनाही दीर्घकाळ संघर्ष करावा लागला आहे.

जागतिक पातळीवर महिलांच्या हक्कांचा लढा जितका जुना आहे तितकाच भारतीय महिलांचा लढा जुना आहे. भारतीय स्त्रियांना पुरुषी समाज रचनेने सामाजिक व शैक्षणिक हक्कापासून वंचित ठेवले आहे. भारतातील स्त्री हक्काची लढाई प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक या तीन टप्प्यांत लढल्या गेल्या आहेत. राजा राममोहन रॉय यांनी महाराष्ट्रातील स्त्रियांसाठी असणारी सतीची चाल बंद केली. सावित्रीबाई फुले, महात्मा फुले यांनी स्त्रियांच्या शिक्षणाला महत्त्व दिले. पंडिता रमाबाई, महर्षी कर्वे, आगरकर, विद्युत भागवत, विठ्ठलरामजी शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील अशा अनेक महापुरुषांनी समाजातील महत्त्वाच्या घटक असणाऱ्या स्त्रियांच्या शैक्षणिक, सामाजिक, राजकीय हक्कांविषयी महत्त्वाचे कार्य केले आहे. स्वातंत्र्यानंतर भारतीय राज्यघटनेच्या कलम १२ ते ३५ अंतर्गत भारतीय स्त्री पुरुषांना मूलभूत अधिकार दिले आहेत.

संयुक्त राष्ट्रसंघानेही महिलांना अधिकार मिळावेत, त्यांना जागतिक प्रतिष्ठा मिळावी या हेतूने १९७५ हे वर्ष आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून जाहीर केले. शांतता, विकास, समानता या सूत्रांवर ८ मार्च हा दिवस आंतरराष्ट्रीय महिला दिवस म्हणून पाळला जातो. तसेच १९७५ ते १९८५ हे दशक 'महिला दशक' म्हणून संयुक्त राष्ट्रसंघटनेद्वारे पाळला. संयुक्त राष्ट्रसंघाने महिला वर्षाची घोषणा केल्यानंतर भारतातही या कल्पनेचे स्वागत करण्यात

 ISBN No. : 978-93-84283-67-4

आले. स्त्रियांची सामाजिक परिस्थिती आणि दर्जा यांचा शोध घेण्यासाठी डॉ. फुलरेण गुहा यांच्या अध्यक्षतेखाली भारतीय महिला आयोगाची स्थापना करण्यात आली. यानंतर प्रत्येक घटक राज्यात राज्य महिला आयोगाची स्थापना करून महिलांचा विकास करण्याचा निर्णय घेतला गेला.

**पुरुषी समाज रचना व महिला :**

जागतिक हक्काच्या जाहिरनाम्यात तसेच भारतीय राज्यघटना, महिला आयोग यांच्या कार्यपद्धतीत स्त्रियांना मान सन्मान व त्यांच्या अधिकारांचे संरक्षण करणे या गोष्टी दिल्या असूनही महिलांवर आज मोठ्या प्रमाणात अन्याय, अत्याचार होत आहे. भारतीय समाज रचना २१ व्या शतकातही पुरुषी मानसिकतेतच आहे. मुलगा हा वंशाचा दिवा आहे हा विचार आजही पाळला जात आहे. मुलगा श्रेष्ठ व मुलगी कनिष्ठ मानून महिलांना दुय्यम स्थान दिले जात आहे. महिलांविषयी जाणीव जागृती करूनही स्त्री भ्रूण हत्या केली जाते. वर्तमान काळात स्त्रीभ्रूण हत्या इतक्या वाढल्या आहेत, की आज मुलींविषयी चिंतेचा विषय बनलेला आहे. स्त्री अर्भकाला जन्मताच मारले जात आहे. हजार पुरुषांमागे स्त्रीयांचे प्रमाण कमी कमी होत चालले आहे. ग्रामीण कुटुंबाबरोबरच उच्चभ्रू, शिक्षित असणाऱ्या शहरी भागातील कुटुंबातदेखील स्त्रीभ्रूण हत्येचे प्रमाण अधिक आहे. स्त्री भ्रूण हत्येमुळे महिलांचा जीवन जगण्याचा अधिकार हिरावून घेतला जात आहे. त्यामुळे लिंग गुणोत्तराचे प्रमाण घटत आहे. २०११ च्या जनगणना अहवालात भारतातील केंद्रशासित व घटक राज्यातील लिंग गुणोत्तराचे प्रमाण पुढीलप्रमाणे :

**तक्ता क्र. १ राज्यनिहाय लिंग गुणोत्तराचे प्रमाण**

| अ.क्र. | भारत/राज्य/केंद्रशासित प्रदेश | लिंग गुणोत्तर १ हजार पुरुषांमागे २००१ | | लिंग गुणोत्तर दर १ हजार पुरुषांमागे २०११ | | २००१ आणि २०११ मधील फरक | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | भारत : एकूण | एकूण | ग्रामीण | शहरी | एकूण | ग्रामीण | शहरी |
| | १ हजार पुरुषांमागे महिला | ९३३ | ९४६ | ९०० | ९४० | ९४७ | ९२६ |
| १. | जम्मू काश्मिर | ८९२ | ९१७ | ८१९ | ८८३ | ८९१ | ८४० |
| २. | हिमाचल प्रदेश | ९६८ | ९८९ | ७९५ | ९७४ | ९८८ | ८५३ |
| ३. | पंजाब | ८७६ | ८९० | ८४९ | ८९३ | ९०६ | ८७२ |
| ४. | चंदिगढ | ७७७ | ६२१ | ७९६ | ८१८ | ६९१ | ८२१ |
| ५. | उत्तराखंड | ९६२ | १००७ | ८४५ | ९६३ | १००० | ८८३ |
| ६. | हरियाणा | ८६१ | ८६६ | ८७४ | ८७७ | ८८० | ८७१ |
| ७. | दिल्ली | ८२१ | ८१० | ८२२ | ८६६ | ८४७ | ८६७ |
| ८. | राजस्थान | ९२१ | ९३० | ८९० | ९२६ | ९३२ | ९११ |
| ९. | उत्तरप्रदेश | ८९८ | ९०४ | ८७६ | ९०८ | ९१४ | ८८८ |
| १०. | बिहार | ९१९ | ९२६ | ८६८ | ९१६ | ९१९ | ८९१ |
| ११. | सिक्कीम | ८७५ | ८८० | ८३० | ८८९ | ८८३ | ९०८ |

ISBN No. : 978-93-84283-67-4

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १२. | अरूणाचल प्रदेश | ८९३ | ९१४ | ८९९ | ९२० | ९२९ | ८८९ |
| १३. | नागालँड | ९०० | ९१६ | ८२९ | ९३१ | ९४२ | ९०५ |
| १४. | मणिपूर | ९७४ | ९६३ | १००९ | ९८७ | ९६६ | १०३८ |
| १५. | मिझोराम | ९३५ | ९२३ | ९४८ | ९७५ | ९५० | १००० |
| १६. | त्रिपुरा | ९४८ | ९४६ | ९५९ | ९६१ | ९५६ | ९७६ |
| १७. | मेघालय | ९७२ | ९६९ | ९८२ | ९८६ | ९८३ | ९९७ |
| १८. | आसाम | ९३५ | ९४४ | ९७२ | ९५४ | ९५६ | ९३७ |
| १९. | पश्चिम बंगाल | ९३४ | ९५० | ८९३ | ९४७ | ९५० | ९३१ |
| २०. | झारखंड | ९४१ | ९६२ | ८७० | ९४७ | ९६० | ९०८ |
| २१. | ओडिसा | ९७२ | ९८७ | ८९५ | ९७८ | ९८८ | ९३४ |
| २२. | छत्तीसगढ | ९८९ | १००४ | ९३२ | ९९१ | १००२ | ९५६ |
| २३. | मध्य प्रदेश | ९११ | ९२७ | ८९८ | ९३० | ९३६ | ९१६ |
| २४. | गुजरात | ९२० | ९४५ | ८८० | ९१८ | ९४७ | ८८० |
| २५. | दमण दीव | ७१७ | ५८६ | ९८४ | ६१८ | ८६७ | ५५० |
| २६. | दादर नगर हवेली | ८१२ | ८५२ | ६९१ | ७७५ | ८६३ | ६८३ |
| २७. | महाराष्ट्र | ९२२ | ९६० | ८७३ | ९२५ | ९४८ | ८९९ |
| २८. | आंध्र प्रदेश | ९७८ | ९८३ | ९६५ | ९९२ | ९९५ | ९८४ |
| २९. | कर्नाटक | ९६५ | ९७७ | ९४२ | ९६८ | ९७५ | ९५७ |
| ३०. | गोवा | ९६१ | ९८८ | ९३४ | ९६८ | ९९७ | ९५१ |
| ३१. | लक्षद्वीप | ९४८ | ९५१ | ९३५ | ९४६ | ९५४ | ९४४ |
| ३२. | केरळ | १०५८ | १०५९ | १०५८ | १०८४ | १०७७ | १०९१ |
| ३३. | तामिळनाडू | ९८७ | ९९२ | ९८२ | ९९५ | ९९३ | ९९८ |
| ३४. | पॉंडिचेरी | १००१ | ९९० | १००७ | १०३८ | १०२९ | १०४३ |
| ३५. | अंदमान निकोबार बेट | ८४६ | ८६१ | ८२५ | ८७८ | ८७१ | ८९१ |

**संदर्भ : जनगणना अहवाल २०११**

वरील तक्त्यात २००१ व २०११ जनगणना अहवालातील स्त्री पुरुषांचे प्रमाण दाखविले आहे. २००१ च्या जनगणनेनुसार भारतातील महिलांचे प्रमाण १ हजार पुरुषांच्यामागे ९३३ इतके होते ते २०११ च्या जनगणनेत ७ पॉईंटस्ने वाढून ९४० इतके झाले आहे. असे असले तरी आज १ हजार पुरुषांमागे ६० महिलांची कमी आहे. २००१ च्या जनगणनेच्या तुलनेत २०११ मध्ये ग्रामीण भागात महिलांची संख्या ९४६ वरून ९४७ इतकी झाली आहे तर शहरी भागात ही वाढ ९०० वरून ९२६ इतकी झाली आहे. देशामध्ये केरळ राज्य हे लिंग गुणोत्तर सर्वात वरच्या स्थानावर असून तिथे १ हजार पुरुषांमागे १०८४ महिला आहेत. येथे ग्रामीण भागातील महिलांचे प्रमाण १०७७ आणि शहरी भागात १०९१ इतके आहे. चंदिगढच्या ग्रामीण भागात हे प्रमाण ६९१ इतके कमी आहे. तर दमन आणि दिवमध्ये नागरी भागात लिंग गुणोत्तराचे प्रमाण देशात सर्वात कमी असून ते १ हजार पुरुषांमागे ५५० स्त्रिया इतके आहे.

देशातील आठ राज्यांनी ग्रामीण भागातील लिंग गुणोत्तराच्या प्रमाणात घट दर्शविली असून यामध्ये जम्मू, काश्मिर, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, बिहार, झारखंड, छत्तीसगढ, महाराष्ट्र, कर्नाटक आणि लक्षद्वीप या केंद्रशासित प्रदेशाचा समावेश आहे तर दादरा नगर हवेली या केंद्रशासित प्रदेशानेही नागरी भागात स्त्रियांच्या प्रमाणात घट दर्शविली आहे. जनगणना अहवालातील आकडेवारीकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. दिवसेंदिवस स्त्री पुरुषातील वाढणारी दरी यातून भविष्यात होणारा गंभीर सामाजिक परिणामाकडे लक्ष देणे अत्यंत गरजेचे आहे.

**महिलांच्या अन्याय, अत्याचारात वाढ :**

महिलांच्या अन्याय, अत्याचारात दिवसेंदिवस वाढ होत आहे. आज महिला कुठेही सुरक्षित नाहीत. नोकरीच्या ठिकाणी, कारखाने, शाळा, महाविद्यालये अशा सार्वजनिक ठिकाणी महिलांवर मोठ्या प्रमाणात लैंगिक अत्याचाराला सामोरे जावे लागत आहे. आज बलात्काराच्या घटना भारतात रोज कोठे ना कोठे घडत आहेत. महिलांवर ॲसिड हल्ला करणे, जबरदस्तीने पळवून नेणे, कौटुंबिक हिंसाचार ही मोठ्या प्रमाणात होत आहे. समाजात स्त्रियांना हुंडाबळीला सामोरे जावे लागत आहे. दहशतवाद, नक्षलवादी हिंसाचारामुळे महिलांना त्यांच्या न्याय्य हक्कांपासून वंचित राहावे लागत आहे. महिलांना आमीषे दाखवून दहशतवादी, नक्षलवादी चळवळीत ओढले जात आहे. पुरुषी दहशतवाद्यांकडून त्यांचा अमानुष छळ होत आहे. आसाम, नागालँड, मिझोराम, ओरिसा या घटक राज्यातील फुटीरतावादी हिंसाचारातील महिलांना आपले प्राण गमवावे लागत आहेत. महिलांना सक्तीने धर्मांतर करण्यास भाग पाडले जात आहे. ग्रामीण, आदिवासी महिलांचे लैंगिक शोषण व धर्मांतर केले जात आहे. त्यामुळे आज महिलांना सर्वत्र अन्याय अत्याचाराला तोंड द्यावे लागत आहे. यामुळे त्यांना त्यांच्या हक्कापासून वंचित राहावे लागत आहे.

**महिलांच्या संरक्षणार्थ असणारे कायदे :**

शासनाने आजपर्यंत महिलांच्या संरक्षणासाठी विविध कायदे केलेले आहेत. ब्रिटिश शासनाने व स्वातंत्र्यानंतर भारतीय शासनाकडून महिलांच्या संरक्षणासाठी त्यांना न्याय्य हक्क मिळावे व त्यांचे सबलीकरण व्हावे यासाठी विविध कायदे करण्यात आले आहेत. महिलांविषयी असणाऱ्या कायद्यांची माहिती पुढीलप्रमाणे.

**विवाहासंबंधी कायदे :**

१. हिंदू विधवा पुनर्विवाह कायदा १८५६
२. धर्मांतरित व्यक्ती विवाह विच्छेद कायदा १८६६
३. भारतीय घटस्फोट कायदा १८६९
४. भारतीय ख्रिस्ती विवाह कायदा १८७२
५. आनंद विवाह कायदा १९०९
६. पारसी विवाह व घटस्फोट कायदा १९३६
७. आर्य विवाह विधिवत कायदा १९३७
८. विशेष विवाह कायदा १९५४

ISBN No. : 978-93-84283-67-4

९. हिंदू विवाह कायदा १९५५
१०.हिंदी उत्तराधिकारी कायदा १९५६
११.हिंदू दत्तक व निर्वाह कायदा १९५६
१२.विवाहित स्त्रियांचा संपत्तीचा कायदा १९५९
१३.विदेश विवाह कायदा १९६९
१४.मुस्लीम स्त्री (घटस्फोट हक्क संरक्षण कायदा) १९८६
१५.मानवी हक्क संरक्षण कायदा १९९३
१६.स्त्रियांचे संवैधानिक अधिकार (भारतीय राज्य घटनेनुसार असलेले अधिकार)
१७.मुस्लीम विवाह कायदा
१८.मुस्लीम स्त्रियांचा मालमत्ता व वारसा हक्काचा कायदा
१९.ख्रिश्चन स्त्रियांचे मालमत्ता व वारसा हक्क

**फौजदारी कायदा :**

१. बालविवाह निर्बंध कायदा १९२९
२ भारतीय दंडविधान कायद्यातील स्त्रियांसंबंधी महत्त्वाची कलमे
३ अनैतिक देह व्यापार प्रतिबंधक कायदा १९५६
४ हुंडा प्रतिबंधक कायदा १९६१
५ वैद्यकीय गर्भपात कायदा १९७१
६ स्त्रियांचे अश्लिल प्रदर्शन प्रतिबंधक कायदा १९८६
७ सती प्रथा प्रतिबंध कायदा १९८७
८ गर्भलिंग चाचणी प्रतिबंध कायदा १९९४
९ कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा २००५
१० महाराष्ट्र देवदासी प्रथा प्रतिबंध व निर्मूलन कायदा २००५

**कामगार स्त्रियांचे अधिकार व हक्कासंबंधीचे कायदे:**

१. कामगारांसाठी नुकसान भरपाई कायदा १९२३
२. वेतन प्रदान कायदा १९३६
३. कारखाने कायदा १९४८
४. किमान वेतन कायदा १९४८
५. राज्य कामगार विमा कायदा १९४८
६. शेती, मळा लागवड कामगार १९५१
७. खाण कायदा १९५२
८. नागरी अधिकारांच्या संरक्षणासंबंधीचा कायदा १९५५
९. मातृत्व लाभासंबंधीचा कायदा १९६१
१०. विडी, सिगार कामगार (कामाचे नियम) कायदा १९६६
११. करार मजूर (नियोजन व निर्मूलन कायदा) १९७०
१२. वेठबिगार प्रथा (प्रतिबंध) कायदा १९७६
१३. समान वेतन कायदा १९७६
१४. आंतरराज्य स्थलांतरिक कामगार (नोकरीच्या अटी व नोकरी नियमन) कायदा १९७९
१५. चित्रपट व नाट्य कामगार (नोकरी नियमन) कायदा १९८१
१६. बालकामगार (प्रतिबंध व नियमन) कायदा १९८६
१७. स्त्रियांच्या लैंगिक छळ प्रतिबंधासंबंधीचे नियम दलित आणि मागासवर्गीय स्त्रियांचे कायदे
१८. अनुसूचित जाती व जमाती (एससी अँड एसटी) अत्याचार प्रतिबंध कायदा १९८९

**अपंग व्यक्तींसाठीचे कायदे :**

१. मानसिक आरोग्य कायदा १९८७
२. अपंग व्यक्ती (हक्क, समान संधी व पूर्ण सहभाग) कायदा १९९५
३. न्याय कायदा १९९९

**इतर महत्त्वाचे कायदे :**

१. हिंदू अज्ञानत्व व पालकत्व कायदा १९५६
२. भिक्षा प्रतिबंधक कायदा १९५९
३. अनाथालये व धर्मदाय गृहांसाठीचा (देखरेख व नियमन) कायदा १९६०
४. अभियोक्ता/वकिलांसाठीचा कायदा १९६१

 ISBN No. : 978-93-84283-67-4

५. कुटुंब न्यायालये कायदा १९८४
६. विधि सेवा प्राधिकरण कायदा १९८७
७. राष्ट्रीय महिला आयोग कायदा १९९०
८. अर्भकासाठीचे कृत्रिम दूध व अन्य अन्न पदार्थ (निर्मिती, वाटप आणि पुरवठा नियमन) कायदा १९९२
९. महाराष्ट्र महिला आयोग १९९३
१०. बालन्याय कायदा २०००
११. माहिती अधिकार कायदा २००५
१२. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा २००६

वरीलप्रमाणे महिलांसाठी विवाहासंबंधी, फौजदारी, कामगार स्त्रियांचे अधिकार व हक्कांसंबंधीचे कायदे, अपंग महिलांसाठीचे कायदे व इतर कायदे असे असंख्य कायदे आहेत. या कायद्यांची व्यवस्थितपणे अंमलबजावणी केल्यास तसेच स्त्री भ्रूण हत्या थांबल्यास, महिलांवर होणारे अन्याय, अत्याचार थांबल्यास, त्यांचे हिरावून घेतले जाणारे अधिकार संरक्षित राहू शकतात. तसेच भारतीय समाजाची मानसिकता बदलणे गरजेचे आहे. महिलांवर दिवसेंदिवस होणारे बलात्कार लैंगिक शोषण थांबले पाहिजेत, तरच महिला समाजात भयमुक्त वातावरणात आपले हक्क प्राप्त करू शकेल.

संदर्भ :

१. Sovinor, Human Rights, Theory and Practises, National Level Seminar Organized by : Shri Shiv Chatrapati College, Junnar, Pune 21st and 22nd feb 2012 page no. 29-52
२. Sovinor, Terrorism and Human Rights, National Level Seminar, Organized by : Dayanand College, Latur 19th and 20th December 2009-11
३. Indian Journal of Human Rights, Human Rights Program, University of Hyderbad
४. लांजेबार ज्योती (२००५) भारतीय समाज आणि स्त्री, सुगावा प्रकाशन, पुणे
५. भारंबे नंदकुमार, मानवी हक्क व समाज, निराली प्रकाशन, पुणे
६. खांडेकर गवई आशा (२००९) महिलांच्या अधिकाराचे उल्लंघन, सुगावा प्रकाशन, पुणे
७. योजना सप्टेंबर २०११
८. भारत सरकार, जनगणना अहवाल २०११
९. दै. लोकमत १२.९.२०१३
१०. दै. सकाळ १२.११.२०१४

❑❑❑

PDEA

**BCUD, Savitribai Phule Pune University**

AND

Pune District Education Association's

**BABURAOJI GHOLAP COLLEGE, SANGVI, PUNE-27**

Accredited at 'B' Grade by NAAC

## State Level Seminar on "Human Rights : Various Aspects"

# CERTIFICATE

This is to Certify that Prof./Dr./Mr. /Ms. Bharat Laxman Rathod

of PDEA's R. M. college Akurdi has been participated/worked as Resource Person /Chairperson presented Paper on Human right, women's

in two days State level Seminar on 'Human Rights : Various Aspects', jointly organized by B.C.U.D., Savitribai Phule Pune University and PDEA's Baburaoji Gholap College, Sangvi, Pune on 9th and 10th January 2015. His / her active participation in this seminar is deeply appreciated.

| | | | |
|---|---|---|---|
| Prof. S. D. Jadhav<br>Co-ordinators | Prof. N. A. Rashinkar<br>Co-ordinators | Prof. S. D. Aghav<br>Vice Principal | Dr. M. G. Chaskar<br>Principal, Asst. Joint Secretary PDEA |